स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: १० नोव्हेंबर, २०२२

जळगाव दि.१० (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धा उद्या दि. ११ नोव्हेंबर पासून सुरु होत असून यामध्ये २८८ मॉडेल्स व पोस्टरचे सादरीकरण केले जाणार आहे.

या विद्यापीठस्तरीय आविष्कार मध्ये ४४५ विद्यार्थ्यांव्दारे २८८ मॉडेल्स व पोस्टर्स चे सादरीकरण केले जाणार आहे. या स्पर्धेत २५४ विद्यार्थिनी व १९१ विद्यार्थी सहभागी होणार असल्याची माहिती स्पर्धेचे समन्वयक प्रा. एस.आर. कोल्हे यांनी दिली.

उद्या शुक्रवार दि. ११ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हाधिकारी अमन मित्तल यांच्या हस्ते होणार आहे. विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात दिवसभर आपल्या पोस्टर व मॉडेल्सचे सादरीकरण विद्यार्थी करतील. शनिवार दि.१२ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ होणार असून त्यासाठी नॅचरली युवर्स बायोटेक, जळगावचे व्यवस्थापक डॉ.निलेश तेली व नोव्होटा थर्माटेक प्रा.लि. चे व्यवस्थापकीय संचालक आर. वाय. चौधरी हे उपस्थित राहणार आहेत.

---

## बातमी क्र. २

जळगाव दि.१० (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात बी.ए. मानसशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास बापूसाहेब शहाजीराव त्र्यंबकराव साळुंखे यांच्या स्मरणार्थ सुवर्णपदक दिले जाणार असून या सुवर्णपदकासाठी प्रा.डी.पी.पवार व प्रतिभा पवार यांनी कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्याकडे दोन लाख रुपये निधीचा धनादेश सुपूर्द केला.

एन.मुक्टोचे माजी सरचिटणीस व माजी केंद्रीय उपाध्यक्ष प्रा.डी.पी.पवार यांनी त्यांचे सासरे बापूसाहेब शहाजीराव त्र्यंबकराव साळुंखे मु.पो.खेडगाव ता.चाळीसगाव यांच्या स्मरणार्थ हे सुवर्णपदक सुरु केले आहे. बी.ए. मानसशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस हे सुवर्णपदक दिले जाणार आहे. हा धनादेश कुलगुरुंकडे सुपूर्द करतांना सौ.प्रतिभा पवार, हेमंतकुमार साळुंखे, केतन पाटील, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, वित्त व लेखा अधिकारी सीए रवींद्र पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक प्रा.दीपक दलाल, माजी अधिसभा सदस्य प्रा.अनिल पाटील, प्रा.एकनाथ नेहेते, प्रा.नितीन बावीस्कर हे उपस्थित होते.

---

## बातमी क्र. 3

जळगाव दि.१० (प्रतिनिधी) - सध्या सायबर क्राईम चे प्रमाण वाढले असल्याच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थी व विद्यार्थिनी मधील सजगता वाढावी यासाठी कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेच्या विद्यार्थ्यांकडून विद्यापीठातील विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यात आली.

विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळा आणि क्विक हिल फाऊंडेशन यांच्यात झालेल्या सामंजस्य करारांतर्गत सायबर सुरक्षेबाबत जनजागृतीचे कार्यक्रम घेण्यात येत आहेत. दिनांक ९ नोव्हेंबर २०२२ रोजी एमबीएच्या च्या विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबद्दल माहिती देण्यात आली. संगणकशास्त्र प्रशाळेचे विद्यार्थी स्वयंसेवक जय पंडित व भावेश थोरात यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

संगणक शास्त्रप्रशाळेतील विद्यार्थी स्वयंसेवक धनराज बोंडे व मानसी बोरोले यांनी सायबर सुरक्षे बद्दल संगणकशास्त्र प्रशाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या दोन्ही सेशनमध्ये त्यांनी २७० विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या दोन्ही कार्यक्रमांना संगणक शास्त्र विभाग प्रमुख प्रा.मनीष जोशी, समन्वयक प्रा.राजू आमले, प्रा. सुरेंद्र कापसे व क्विक हिल फाउंडेशन, पुणे यांच्यातर्फे महेश भर्डी आदी उपस्थित होते.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी